| | |
|---|---|
| MHKO140002972025 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२३/२०२५**<br>श्री. शंकर शिवाजी कांबळे आणि वगैरे.२<br>**विरुद्ध**<br>कोणी नाही. |

## निशानी क्रमांक ०१ वरील आदेश

(दिनांक १०/०३/२०२६)

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज, भारतीय वारसा कायदा कलम **३७२** अन्वये वारसा दाखला मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडिल शिवाजी भरमू कांबळे हे दिनांक ०६/०८/२०१५ रोजी मौजे कालकुंद्री, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथे त्यांचे राहते घरी मयत झालेले असून, अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई सुशिला शिवाजी कांबळे ही मौजे शिनोळी बु., ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथे दिनांक १६/०१/१९८२ रोजी मयत झालेली आहे. त्यांचे पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयत यांचे पश्चात त्यांचे सहायक भविष्य निधि आयुक्त पेन्शन, क्षेत्रीय कार्यालय, भविष्य निधी भवर, ताराबाई पार्क, कोल्हापूर या कार्यालयाने कामगार पेन्शन योजना १९९५ अंतर्गत मासिक पेन्शन प्रकरणे निकालात काढण्यासाठी कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत अर्जदार यांना दिनांक २४/०६/२०१९ रोजीच्या पत्राने कळविले. त्याप्रमाणे त्यानंतर बॅक ऑफ इंडिया, शाखा– गुरुवार पेठ, चंदगड या बॅकेतील मयत शिवाजी भरमू कांबळे यांच्या खाते क्र.०९१२१०१०००१३४५५ वर रक्कम रु.५१,१००/– (एक्कावण हजार शंभर रुपये) इतकी रक्कम अद्याप शिल्लक असल्याचे समजले आहे. याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रकरणामध्ये दि.२८/११/२०२५ रोजीच्या '' दैनिक तरुण भारत'' मध्ये जाहीर प्रगटन करण्यात आले. कायदयाच्या तरतुदीप्रमाणे, जाहीरनामा नि.क्र.७/ड प्रमाणे

बजावण्यात आला. प्रस्तुत प्रकरणामध्ये, अर्जदाराच्या मागणीस, कोणीही हरकत घेतलेली नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जदार क्र.३ मारुती शिवाजी कांबळे यांनी त्यांचे पुरावा प्रतिज्ञालेख दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञालेखामध्ये नमुद केलेला मजकुर अर्जदाराच्या अर्जातील कथनास पुष्टी देणारा आहे. अर्जदारतर्फे मारुती शिवाजी कांबळे यांनी असे कथन केले आहे की, ते मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार यांना सहायक भविष्य निधि आयुक्त पेन्शन, क्षेत्रीय कार्यालय, भविष्य निधी भवर, ताराबाई पार्क, कोल्हापूर या कार्यालयाने कामगार पेन्शन योजना १९९५ अंतर्गत अर्जदार यांना दिनांक २४/०६/२०१९ रोजीच्या पत्राने कळविले. त्याप्रमाणे त्यानंतर बॅक ऑफ इंडिया, शाखा– गुरुवार पेठ, चंदगड या बॅकेतील मयत शिवाजी भरमू कांबळे यांच्या खाते क्र.०९१२१०१०००१३४५५ वर रक्कम रु.५१,१००/– (एक्कावण हजार शंभर रुपये) इतकी रक्कम अद्याप शिल्लक असल्याचे समजले आहे. तरी अर्जदार क्र.१ ते ३ यांचे नावे वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

६. अर्जदाराने कागदोपत्रीपुरावा म्हणून मयत शिवाजी भरमू कांबळे आणि मयत सुशिला शिवाजी कांबळेयांच्या मृत्यूची मुळ प्रमाणपत्रे नि.क्र.१७ व नि.क्र.१८ वर दाखल केलेले आहे. अर्जदाराने पुरावा बंद पुरसीस नि.क्र.२० खाली दाखल केलेली आहे. निशाणी क्र.१२ प्रमाणे दि.२८/११/२०२५ रोजीच्या '' दैनिक तरुण भारत'' वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस दाखल केली आहे.

७. जाहीरनामा व अर्ज नियमाप्रमाणे, मयताच्या घराच्या समोरील बाजूस लावण्यात आले, जाहीरनामा व अर्जाची एक प्रत ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर लावण्यात आली व मुनादीने जाहीर केले. एक प्रत न्यायालयाच्या नोटीस फलकावर लावण्यात आली. उपरोक्त पध्दतीने, जाहीरनामा बजावुन व जाहीर प्रगटन करुन देखील अद्याप कोणीही सदर अर्जास हरकत घेतलेली नाही.

८. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडिल हे दिनांक ०६/०८/२०१५ रोजी तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई हिचे दिनांक १६/०१/१९८२ रोजी निधन झालेले आहे. अर्जदाराच्या अर्जास मुदतीच्या आत कोणीही हरकत नोंदवली नाही. सबब अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. सबब. मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ यांना भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वर नमुद रक्कम **रु.५१,१००/- (एक्कावण हजार शंभर रुपये)**, त्यावरील व्याज असल्यास, करिता वारसा प्रमाणपत्र आवश्यक न्यायालयीन शुल्क स्वीकारुन देण्यांत यावे.

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.03.10 15:44:14 +0530

**दिनांक-१०/०३/२०२६** **(वामन दि. जाधव)**

**ठिकाणः-चंदगड.** **सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, चंदगड.**